Kandalvan tipani.2020 16

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय,

पत्रव्यवहाराचा पत्ता : ठाणे स्टेशन रोड, ठाणे (प.), तालुका व जिल्हा ठाणे, पिन कोड - ४०० ६०१.
दुरध्वनी क्र. ०२२ - २५३३११६४ ई-मेल : tahthane@gmail.com

क्र.महसूल/क-१/टे-२/जमीनबाब/कावि-का.त.९०/७९९७ /२०२० दिनांक :०९/११/२०२०

प्रति,
मा.सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

विषय : Debris and Garbage dumping in the Creekand on the Mangroves in Sector -11 Belapur.

संदर्भ : श्री. के. एस. शुक्ला यांनी मा. कांदळवन सरक्षण व संवर्धन सनियंत्रण यांचेकडे केलेला दि.०६९/११/२०१९ रोजीचा तक्रारी अर्ज. (तक्रार क्र.९०)

file: minutes/Agenda.

उपरोक्त विषयाबाबत श्री. के. एस. शुक्ला यांनी, Debris and Garbage dumping in the Creekand on the Mangroves in Sector -11 Belapur बाबत मा. कांदळवन संरक्षण व संनियंत्रण समितीकडे केलेला तक्रारी अर्ज मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेमार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने १) नायब तहसिलदार (संगायो) ठाणे- मनोज सुर्वे, २) प्रभारी मंडळ अधिकारी, बेलापूर, ३) तलाठा साझा बेलापूर, ४) नगर भूमापक, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, ठाणे – श्री. संदिप लोहकरे यांनी तक्रारदार यांचे समवेत दिनांक ०२/११/२०२० रोजी एकत्र स्थळ पाहणी केली.

मौजे बेलापूर, ता.जि. ठाणे येथील Debris and Garbage dumping in the Creekand on the Mangroves in Sector -11 Belapur या जागेत कचरा व डेब्रीज टाकल्याने कांदळवनाचे भविष्यात नुकसान होण्याची भिती असल्याचे अर्जदार यांनी सांगितले. सदर तक्रारीचे अनुषंगाने अर्जात नमूद जागेची संयुक्त स्थळपाहणी केली असता, कांदळवन क्षेत्रामध्ये कोठेही डेब्रीज टाकलेले दिसून आले नाही. सदर जागेमध्ये काही क्षेत्रामध्ये खाडीच्या भरतीच्या पाणीप्रवाहावेळी प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या व थर्मकॉल आल्याने तसेच काही जागेमध्ये घनकचरा आहे. त्यामध्ये कोठेही कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, भविष्यात नुकसान होण्याची भिती आहे. तरी सदरचे घनकचरा प्लास्टिक बाटल्या, पिशव्या या नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत काढून टाकाव्यात.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 380
दिनांक 04/12/2020
उप वनसंरक्षक

Kandalvan tipani.2020 17

प्रकरणी तक्रारीत नमूद जागेवरील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या व थर्मकॉल इत्यादीचा असलेला घनकचरा काढून टाकणेबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. महसूल/क-१/टे-२/जमीनबाब/कावि७९९८/२०२०, दि. ०९/११/२०२० अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

सदर जागेचे GEO TAGGING चे फोटो व मंडळ अधिकारी बेलापूर यांचेकडील मूळ अहवाल व जागेवरील पंचनामा सोबत सादर केलेला आहे.

(युवराज बांगर)
तहसीलदार ठाणे